पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक – ७७

सभावृत्तांत

दिनांक - १०/०९/२०१३ वेळ - सकाळी ११.00 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक १०/०९/२०१३ रोजी सकाळी ११.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगताप नवनाथ दत्तु - सभापती
२) मा.अविनाश (दादा) टेकावडे
३) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५) मा.छाया जगन्नाथ साबळे
६) मा.भालेकर अरुणा दिलीप
७) मा.वाघेरे सुनिता राजेश
८) मा.महेशदादा किसन लांडगे
९) मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
१०) मा. लोंढे गणेश नारायण
११) मा.कदम सदगुरु महादेव
१२) मा.भोंडवे संगिता राजेंद्र
१३) मा.शेंडगे आशा सुखदेव

याशिवाय मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.झुरे – सह आयुक्त, मा.गायकवाड, मा.खांडकेकर, मा.दुरगुडे, मा.कुलकर्णी, मा.ढेरे, मा.माछरे – सहा.आयुक्त, मा.घाडगे – मुख्यलेखापरीक्षक, मा.गावडे – नगरसचिव, मा.कांबळे – प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे – विकास अभियंता,मा.चव्हाण,मा.पाटील,मा.तुपे सह शहर अभियंता, मा.भोसले – मुख्यलेखापाल, मा.डॉ.रॉय – प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी, मा.भदाणे - उपसंचालक (नगररचना) मा.निकम, मा.काची, मा.रामदास जाधव, मा.शरद जाधव, मा.चव्हाण, मा.चिंचवडे, मा.थोरात, मा.साळवी, मा.लडकत,मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.पिरजादे, मा.दांगट, मा.सय्यद, मा.बरशेट्टी, मा.जुंधारे,मा.तांबे - कार्यकारी अभियंता, मा.कांबळे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.पवार – प्र.कायदा सल्लागार,मा.गावडे – अग्निशामक अधिकारी, मा.इंदलकर –कामगार कल्याण अधिकारी, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-

विषय क्र. ३५) क प्रभाग मनपाभवन कार्यक्षेत्रातील प्र.क्र.३७ महात्मा फुले नगर येथील स्ट्रीटलाईट बदलणेबाबत..

विषय क्र. ३६) तरतुद वर्ग करणेबाबत..मा.सदगुरु कदम, मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव..

विषय क्र. ३७) मा.स्थायी समिती ठराव क्र. ३९८१ हा ठराव रद्द करणेबाबत..मा.चंद्रकांत वाळके,मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव..

विषय क्र. ३८) पिंपरी चिंचवड शहरातील मुख्य चौक व रस्ते यासाठी वाहतुक व सुविधा विषयक कामे करणेबाबत.. मा. सदगुरु कदम, मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव..

विषय क्र. ३९) अ प्रभागातील अंदाजपत्रकातील स्थापत्य विकास कामांच्या तरतुदींमध्ये वाढ घट करणेबाबत.. मा.चंद्रकांत वाळके,मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव..

विषय क्र. ४०) सन २०१३ – १४ च्या मुळ अंदाजपत्रकातील ड मुख्यालयाकडील वाढ घट करणेबाबत.. मा. सदगुरु कदम, मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव..

विषय क्र. ४१) स्थायी समिती सभा दिनांक ३.०९.२०१३ रोजीचे विषयपत्रामध्ये दुरुस्तीबाबत.. मा.आशा शेंडगे,मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव..

विषय क्र. ४२) नागरी सुविधा केंद्रामध्ये शिधापत्रीका वितरण कक्षाला मुदतवाढ देणेबाबत.. मा. सदगुरु कदम, मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव..

विषय क्र. ४३) सन २०१३ - १४ चे अंदाजपत्रक तरतुद वर्ग करणेबाबत.. मा. सदगुरु कदम, मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव..

विषय क्र. ४४) मा.महापौर यांचे ***Indian Urban Sector*** या विषयावरील युरोप येथील अभ्यास दौ-याबाबत.

विषय क्र.४५) मनपाचे दवाखाने सि.सि.टि.व्ही सर्व्हेलन्स यंत्रणा उभारणेबाबत..मा अविनाश टेकावडे, मा. चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव..

------------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक :- चंद्रकांत वाळके                                        अनुमोदक :- मा.शकुंतला धराडे

पाणी पुरवठा व्यवस्थीत व सुरळीतपणे होत नसल्याने सभा मंगळवार दिनांक १०/०९/२०१३ रोजी दुपारी १२.२० पर्यंत तहकुब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

मा.सभापती :- मंगळवार दिनांक १०/०९/२०१३ रोजी सकाळी १२.२० वाजेपर्यंत सभा तहकुब करणेत येत आहे.

(जगताप नवनाथ दत्तु)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिति

कार्यपत्रिका क्रमांक – ७७

सभावृत्तांत

(दिनांक १०/०९/२०१३ ची सकाळी ११.०० ची तहकुब सभा)

दिनांक - १०/०९/२०१३ वेळ - दुपारी १२.२० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक १०/०९/२०१३ सकाळी ११.०० वाजेची तहकुब सभा मंगळवार दिनांक १०/०९/२०१३ रोजी दुपारी १२.२० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगताप नवनाथ दत्तु - सभापती
२) मा.अविनाश (दादा) टेकावडे
३) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५) मा.छाया जगन्नाथ साबळे
६) मा.भालेकर अरुणा दिलीप
७) मा.वाघेरे सुनिता राजेश
८) मा.महेशदादा किसन लांडगे
९) मा.बारणे माया संतोष
१०) मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
११) मा. लोंढे गणेश नारायण
१२) मा.कदम सदगुरु महादेव
१३) मा.भोंडवे संगिता राजेंद्र
१४) मा.शेंडगे आशा सुखदेव

याशिवाय मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.झुरे – सह आयुक्त, मा.गायकवाड, मा.खांडकेकर, मा.दुरगुडे, मा.कुलकर्णी, मा.ढेरे, मा.माछरे – सहा.आयुक्त, मा.घाडगे – मुख्यलेखापरीक्षक, मा.गावडे – नगरसचिव, मा.कांबळे – प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे – विकास अभियंता,मा.चव्हाण,मा.पाटील,मा.तुपे सह शहर अभियंता, मा.भोसले – मुख्यलेखापाल, मा.डॉ.रॉय – प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी, मा.भदाणे - उपसंचालक (नगररचना) मा.निकम, मा.काची, मा.रामदास जाधव, मा.शरद जाधव, मा.चव्हाण, मा.चिंचवडे, मा.थोरात, मा.साळवी, मा.लडकत,मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.पिरजादे, मा.दांगट, मा.सय्यद, मा.बरशेट्टी, मा.जुंधारे, मा.तांबे, - कार्यकारी अभियंता, मा.कांबळे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.पवार – प्र.कायदा सल्लागार,मा.गावडे – अग्निशामक अधिकारी, मा.इंदलकर – कामगार कल्याण अधिकारी, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**-------**

दिनांक ०३/०९/२०१३ व ०४/०९/२०१३ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक - ७६)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

--------

ठराव क्रमांक – ४०५९ विषय क्रमांक – १
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – क्रीडा
सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र. क्रीडा/३/कावि/२७१/२०१३दि.१७/०७/२०१३
विषय :- सन २०१२ – १३ या आर्थिक वर्षात नोंदणीकृत सार्व संस्था/मंडळे यांना अनुदान अदा केलेबाबत..

विषय क्रमांक १ चा विचार दिनांक १/१०/२०१३ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०६० विषय क्रमांक – २
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – विद्युत उद्यान
सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.विउ/T2/४/२०१३दि.२२/८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे विद्यूत उद्यान विभागाकडील सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकातील तरतूदीचे विद्युत उद्यान व किरकोळ देखभाल दुरूस्ती ह्या लेखाशिर्षांतर्गत प्रस्तावा सोबत जोडलेल्या प्रपत्र 'अ' नुसार वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे (वाढ/घट र.रू.४२,४६,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०६१ विषय क्रमांक – ३
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – ब प्रभाग स्थापत्य
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.बप्र/स्था/काअ/२/५५/२०१३दि.२५/८/२०१३
विषय :- ब प्रभागातील सन २०१३ – १४ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विकास कामांच्या तरतुदींमध्ये वाढ घट करणेबाबत..

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०६२ विषय क्रमांक – ४
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार
सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक – मा. संगिता भोंडवे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.मसाभां/५/कावि/५०८/२०१३दि.२९/८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन -

मनपाच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या इमारतीमधील कॉरीडॉर (कॉरीडॉर, इनडोअर, संडास, बाथरुम, मुता-या), अंतर्गत व बाहय परिसराची दैनंदिन साफसफाई व स्वच्छता करणेकामी सध्या काम करीत असलेल्या मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., यांना पुर्वीच्या झालेल्या करारनाम्यास अधिन राहून ई-निविदा नोटीस क्रमांक-०१/२०१३-२०१४ ची संपूर्ण कार्यवाही होवून नविन निविदाधारकास कामाचा आदेश देई पर्यंत दोन महिने मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०६३ विषय क्रमांक – ५
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – मुख्य लेखा परिक्षक
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा. क्र.मुलेप/१/कावि/७३/२०१३दि.२७/८/२०१३

मा. मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे जुलै २०१३ मधील अद्ययावत एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०६४ विषय क्रमांक – ६
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – मुख्य लेखा परिक्षक
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.आशा शेंडगे

संदर्भ:- मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा. क्र. मुलेप/१/कावि/७४/२०१३दि.२७/८/२०१३

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२९.७.२०१३ ते दि.४.८.२०१३ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र. मुलेप/१/कावि/७४/२०१३ दि.२७.८.२०१३ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०६५ विषय क्रमांक – ७
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – मुख्य लेखा परिक्षक
सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा. क्र.मुलेप/१/कावि/७५/२०१३दि.२७/८/२०१३

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.५.८.२०१३ ते दि.११.८.२०१३ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र. मुलेप/१/कावि/७५/२०१३ दि.२७.८.२०१३ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०६६ विषय क्रमांक – ८
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – मुख्य लेखा परिक्षक
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा. मुख्य लेखा परिक्षक यांचे जा. क्र.मुलेप/१/कावि/७६/२०१३दि.२७/८/२०१३

मा. मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१२.८.२०१३ ते दि.१८.८.२०१३ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.

मुलेप/१/कावि/७६/२०१३ दि.२७.८.२०१३ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०६७ विषय क्रमांक – ९

दिनांक – १०/९/२०१३ विभाग – स्थापत्य वाहतुक

सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भः- मा.सह शहर अभियंता यांचे जा. क्र.स्था/वा.क/कावि/५५/२०१३दि.३०/८/२०१३

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य (वाहतूक) विभागाकडील नि.नो.क्र.२६/२०१२-१३ मधील अ.क्र.१६ अन्वये, ब प्रभाग कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यावरील हॉस्पीटल परिसरात नागरिकांना सुरक्षित रस्ता ओलंडणेच्या सुविधा तयार करणेकामी मे.प्रिझम एन्टरप्रायजेंस (नि.र.रू.१४,००,५६०/- [र.रू.चौदा लाख पाचशे साठ] पेक्षा ३२.६२ **%** कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रू.९,९०,८८२/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदे मधील निविदा अटीप्रमाणे मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधी मध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर कामाचा करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०६८ विषय क्रमांक – १०

दिनांक – १०/९/२०१३ विभाग – क्रीडा

सुचक – मा.महेशदादा लांडगे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र. क्रीडा/आस्था १/कावि/१५७/२०१३दि.२३/८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन-

मनपाचे क्रीडा विभागाकडील विषयपत्रानुसार-

१) श्री देवांग गोपाल, क्रिडा मार्गदर्शक (बॉक्सिंग) मानधन र. रू 15000/- प्रतिमहा प्रमाणे 6 महिने X 15000/- प्रमाणे अपेक्षित खर्च र.रू 90000/- (अ)

२) श्री विजय रणझुंझारे क्रीडा मार्गदर्शक (रायफल शुटिंग) मानधन र.रू 10000/- प्रतिमहा प्रमाणे 6 महिने X 10000/- प्रमाणे अपेक्षित खर्च र.रू 60000/- (ब)

३) श्री लांडगे गणेश, क्रिडा मार्गदर्शक (हॉकी), मानधन र.रू 10000/- प्रतिमहा प्रमाणे 6 महिने X 10000/- प्रमाणे अपेक्षित खर्च र.रू 60000/- (क)

४) श्री कपोते नंदकिशार, कला/सांस्कृतिक पर्यवेक्षक/मानद सल्लागार मानधन र. रू. 15000/- प्रतिमहा प्रमाणे 6 महिने X 15000/- प्रमाणे अपेक्षितखर्च र.रू 90000/- (ड)

क्रीडा विभागाकडील उपरोक्त प्रमाणे मानधनावरील कर्मचा-यांना तात्पुरत्या स्वरूपात ६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेस व उपरोक्त प्रमाणे गत नेमणूकीचे मानधनात वाढ करून येणा-या र.रु.३,००,०००/- (अक्षरी र.रु.तीन लाख फक्त )खर्चास मान्यता देणेस तसेच श्री.परबत बंडु कुंभार – राष्ट्रीय पंच व खेळाडु (बॅडमिंटन) यांची क्रिडा मार्गदर्शक मानधनावर नियुक्ती करणेत यावी. कबड्डी – लविना गायकवाड यांची मानधनावर नियुक्ती करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ४०६९ विषय क्रमांक – ११

दिनांक – १०/९/२०१३ विभाग – स्थानिक संस्था कर

सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.स्थासंक/२३/कावि/१५/२०१३दि.३०/८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

स्थानिक संस्था कर विभागाकडे जमा होणा-या रकमांचे लेखाशिर्षनिहाय वर्गीकरण होणेसाठी खालील प्रमाणे दोन लेखाशिर्ष व त्यासमोरील तरतुद सन २०१३-२०१४ चे अंदाजपत्रकात नव्याने निर्माण करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

| | |
|---|---|
| स्थानिक संस्था कर व्याज (LBT Int.) | ५०,०००/- |
| स्थानिक संस्था कर दंड (LBT Penalty) | ५०,०००/- |
| **एकुण** | **१,००,०००/-** |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०७० विषय क्रमांक – १२

दिनांक – १०/९/२०१३ विभाग – अग्निशामक

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र. अग्नि/१/कावि/२४५/२०१३दि.१०/७/२०१३

विषय :- महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन मुख्यसमन्वयक या पदावर एकत्रीत मानधनावर नियुक्तीबाबत..

विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ४०७१ विषय क्रमांक – १३

दिनांक – १०/९/२०१३ विभाग – अग्निशामक

सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.सदगुरु कदम

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र. अग्नि /१/कावि/३००/२०१३दि.२९/८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाचे अग्निशामक विभागांतर्गत आपत्ती व्यवस्थापन विभागास शासनाकडून प्राप्त झालेली र.रु.५०,००,०००/- (अक्षरी र.रु.पन्नास लाख फक्त) शासकीय सहाय्यक अनुदानाचा विनियोग योग्य रितीने होणेकामी " बिगर प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन अनुदान " या नावे तुर्त अग्निशामक विभागामध्ये नविन लेखाशिर्ष व त्यांचे स्वतंत्र खाते निर्माण करणेस मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०७२ विषय क्रमांक – १४
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – वाहतुक नियोजन
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.स्था/वा.क/कावि/१४६/२०१३दि.३१/७/२०१३

विषय :- अवैध पार्किंग व्यवस्थेबाबत..

विषय क्रमांक १४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०७३ विषय क्रमांक – १५
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.मभां/७/कावि/४२९/२०१३दि.३०/८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाचे विद्युत विभागासाठी तातडीने प्रस्तावात नमुद लॅम्प साहित्य खरेदीकामी ई-निविदा क्र.१०/१/२०१३-१४ अन्वये लघूत्तम निविदाकार मे.एन.एस.जैन अँन्ड कं.प्रा.लि.पुणे यांचे विविध लॅम्प साहित्याचे दर एकुण र.रू.१०,३३,५००/- स्विकृत करून, करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत केलेला असल्याने प्रस्तूतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०७४ विषय क्रमांक – १६
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – वैद्यकिय मुख्य
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.वैद्य/०८/कावि/२१४/२०१३दि.३१/८/२०१३
विषय : स्थायी आस्थापना या लेखाशीर्षातुन गणवेष शिलाई या लेखाशीर्षावर तरतुद वर्ग करणेबाबत..

विषय क्रमांक १६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०७५ विषय क्रमांक – १७
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – जनतासंपर्क व स्वागतकक्ष
सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.विनया तापकीर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.जसं/६/कावि/६०१/२०१३दि.३०/८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने शहरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे विविध विषयांवरील देखाव्यांच्या स्पर्धेचे आयोजन दरवर्षी करण्यात येते. या स्पर्धेअंतर्गत विजेत्या मंडळास धनादेशाद्वारे बक्षिसांची रक्कम अदा करुन व प्रशस्तिपत्रक देवून सत्कार केला जातो. त्याप्रमाणे यावर्षीही सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. याकरीता थेट पध्दतीने र.रु. २,२०,५००/- (अक्षरी र.रु. दोन लाख वीस हजार पाचशे ) इतका खर्च धनादेशाद्वारे होणार असून तसेच शांतता बैठकीबाबत रंगमंदिर भाडे, फ्लेक्स, बॅनर, स्पर्धेच्या परिक्षण समितीचे मानधन, चहापान, भोजन इ. व्यवस्थेकरीता व

गणेशविसर्जनाचे दिवशी पत्रकारांचे भोजन व्यवस्थेकरीता र.रु.८०,०००/- (अक्षरी र.रु. ऐंशी हजार फक्त) इतका रोख स्वरुपात खर्च होणार असून एकूण र.रु. ३,००,५००/- (अक्षरी र.रु. तीन लाख पाचशे फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०७६ विषय क्रमांक – १८

दिनांक – १०/९/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.मभां/०४/कावि/७८०/२०१३दि.३१/८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाचे विविध विभागाकडील 2500 नग ओळखपत्र अल्पमुदत ई नि.सु.क्र.09/2012-13 मे. कापसे एंटरप्रायजेस, पिंपरी वाघेरे यांचेकडुन दर र.रु. 64/- प्रती नग प्रमाणे छपाईकामी येणा-या र.रु.1,60,000/- खर्चास व त्याचबरोबर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०७७ विषय क्रमांक – १९

दिनांक – १०/९/२०१३ विभाग – वैद्यकिय

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.वैद्य/७/कावि/१७६१/२०१३दि.२/९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

अंध असलेले अपंगाना त्यांनी अपंगत्वाचे प्रमाणपत्राची/दाखला मागणी केल्यास त्यांचेकडुन अपंग असलेबाबतचे कागदपत्रांची पडताळणी करुन व शारिरीक तपासणी करुन व नियमानुसार मनपाची फी आकारुन त्यांना प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करणे व वैद्यकीय तपासणी करताना सर्व तपासण्या उदा. रक्त, लघवी, थुंकी तपासणी फी, एक्सरे फी, सोनोग्राफी फी, अशा प्रकारच्या सर्व तपासण्या मोफत करणेस मान्यता देणे परंतु तपासणी फी (केस पेपर व केसपेपर सोबतची सल्ला फी) व दाखला माफ असणार नाही. सदरचा विषय मान्यतेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ४०७८ विषय क्रमांक – २०

दिनांक – १०/९/२०१३ विभाग – पाणीपुरवठा

सुचक – मा.महेशदादा लांडगे अनुमोदक – मा.आशा शेंडगे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.पापु/नि/कावि/७८७/२०१३दि.२/९/२०१३

विषय : निविदा नोटीस क्रमांक ६/४२/२०१२ -१३ मधील अ.क्र.१३ कामांचे करारनामे करणेस मंजुरी मिळणेबाबत..

विषय क्रमांक २० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०७९ विषय क्रमांक – २१
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – जलशुध्दीकरण केंद्र
सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.अरुणा भालेकर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.जशुके/वि/४/६०/२०१३दि.२७/८/२०१३

विषय :- पिं.चिं.मनपा च्या विद्युत विभागांतर्गत शुध्द अशुध्द जलउपसा केंद्र से.२३ विभागाकडील भांडवली कामे लेखाशिर्षकांतर्गत नवीन कामाच्या पुर्णत्वासाठी अंतर्गत तरतुद वर्गीकरण करणेबाबत..

विषय क्रमांक २१ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०८० विषय क्रमांक – २२
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.स्था/तां/१/१६०/२०१३दि.२९/८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील इमारतींचे संरक्षणात्मक परिक्षण (Structural Audit ) अनिवार्य करणेबाबतच्या अधिनियमात केलेल्या सुचनेनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २६५ (अ) प्रमाणे अंमलबजावणी करणेसाठी बांधकाम अभियंता पॅनेल नेमणूक करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सदर प्रपत्र ब व क चे अवलोकन होऊन पिंपरी चिंचवड महापालिका परिसरातील मनपाच्या मिळकती अथवा जुन्या मिळकतींना ३० वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. अशा इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट पहिल्या टप्प्यात करणे व दुस-या टप्प्यात महापालिकेची ज्या-ज्या ठिकाणी महत्वाची कार्यालये अथवा इमारती आहेत अशा महापालिकेच्या महत्वाच्या मालमत्तांचे व कार्यालयीन रेकॉर्ड नैसर्गिक आपत्तीपासुन व इतर संभावित धोक्यापासुन संरक्षित करण्याकरीता म.न.पा.ने नोंदणीकृत “बांधकाम अभियंता” यांचेमार्फत करणे आवश्यक असल्याने या कामी “बांधकाम अभियंता” यांची नेमणूक करण्यास तसेच प्रस्तावासोबत जोडलेल्या दरसूचीतील दरांना मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०८१ विषय क्रमांक – २३
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – स्थापत्य वाहतुक
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जा. क्र.स्था/नि/१३अ/कावि/१४४/२०१३दि.२/०९/२०१३

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य नि.नो.क्र.अमुख्यालय/HO/१४/ २०१२-१३ मधील अ.क्र.०७ अन्वये, नविन प्रभाग क्र.१७ मधील से.क्र.२६ व २७ मधील अंतर्गत रस्त्याचे कडेने पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी मे. सांडभोर कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.२२,४०,८९६/- [र.रू.बावीस लाख चाळीस हजार आठशे शहान्नव] पेक्षा २७.२८ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रू. १७,११,०५९/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदे मधील निविदा अटीप्रमाणे मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये

कंत्राट कालावधी मध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर कामाचा करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०८२ विषय क्रमांक – २४
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – मध्यवर्ती औषध भांडार
सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.शकुंतला धराडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.मऔभां/१/कावि/१७५/२०१३दि.३१/८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

स्वाईन फ्ल्यु रूग्णांकरिता आवश्यक Syp Fluvir 75ml. अंदाजे ५०० बॉटल्सचे अधिकृत विक्रेते मे.निरामय ड्रग स्टोअर, चिंचवड यांचेकडुन टप्प्या-टप्प्याने आवश्यकतेनुसार थेट पध्दतीने खरेदीकामी येणा-या र.रू.**२,१८,५००/-** चे खर्चास व सन २०१३-१४ साठी मागणीनुसार तातडीने खरेदी करणेकामी येणा-या पुढील प्रत्यक्ष खर्चास व खरेदीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०८३ विषय क्रमांक – २५
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – स्थापत्य वाहतुक
सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.अरुणा भालेकर
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/१अ/कावि/१४५/२०१३दि.२/०९/२०१३

मा. शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य नि.नो.क्र.अमुख्यालय/HO/१४/ २०१२-१३ मधील अ.क्र.२४ अन्वये, नविन प्रभाग क्र.१४ मधील से.क्र.२४, २५ व २६ मधील अंतर्गत रस्त्याचे कडेने पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी मे.रेणूका कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.२२,४०,८९६/- [र.रू.बावीस लाख चाळीस हजार आठशे शहान्नव] पेक्षा २७.७५ **%** कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रू. १७,००,०००/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदे मधील निविदा अटीप्रमाणे मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधी मध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर कामाचा करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०८४ विषय क्रमांक – २६
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – पाणीपुरवठा
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.पापु/नि/कावि/७९४/२०१३दि.०३/०९/२०१३

विषय :- निगडी से.२३ जलशुध्दीकरण केंद्रासाठी आवश्यक असणारे द्रवरुप पी.ए.सी. रसायन खरेदीबाबत..

विषय क्रमांक २६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०८५ विषय क्रमांक – २७
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र. मभां/०४/कावि/७८३/२०१३दि.३/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मे. सृजन कम्युनिकेशन, नांदेड यांनी 10 कलमी कार्यक्रमांतर्गत फोर कलर पुस्तिका आकर्षक व उत्तम छपाई करुन दिलेले असलेने त्यांचे काम समाधानकारक आहे. तरी वाढीव 08 पानाचे बिल र.रु. 21500/- व ट्रान्सपोर्ट चार्जेस र.रु. 7000/- असे एकुण र.रु. 28500/- अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०८६ विषय क्रमांक – २८
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – नगर रचना व विकास
सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.नरवि/कावि/१५/पिंपरी/११/२०१३दि.४/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना भूसंपादन अधिनियम १९६६ चे कलम १२६ अन्वये सुधारित मंजुर विकास योजनेतील मौजे पिंपरी वाघेरे, ता. हवेली येथील स.नं.७ पै., २२४ पै.,२२५ पै. या जागेवरील १८.०० मी. रूंद रस्त्याचे बाधित क्षेत्र भूसंपादन करणेकामी, सदर रस्त्याकरिता भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे पाठविणे करिता मा.महापालिका सभेने दि.२७/०६/२०१३ रोजी ठराव क्र.३०३ अन्वये मान्यता दिलेली आहे. तरी प्रस्तुत जमीनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना भूसंपादन अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूसंपादन अधिनियम अन्वये भूसंपादन करणेकामी सदर रस्त्याच्या भूसंपादनासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०८७ विषय क्रमांक – २९
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – पाणीपुरवठा
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.पापु/६/कावि/७९९/२०१३दि.०४/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.६/४२/२०१२-१३ मधील अ.क्र.१५ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पंपिंग स्टेशनवर पंप ऑपरेटर ठेकेदार पध्दतीने पुरविणेकामी मे.शुभम उद्योग (नि.र.रू.९९,८८,३८४/- पेक्षा ३.४१९ % कमी (किमान वेतन दराची) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०८८ विषय क्रमांक – ३०
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – विद्युत
सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.वि/मुका/३२५/२०१३दि.४/९/२०१३

विषय :- नाशिकफाटा उड्डाणपुलाच्या सुशोभीकरणासाठी एल.ई.डी.दिवे वापरणेबाबत..

विषय क्रमांक ३० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०८९ विषय क्रमांक – ३१
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – कायदा
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.कास/६/कावि/७१४/२०१३दि.५/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मोटार वाहन अपघात दावा क्रमांक ७८०/११ आणि दावा क्रमांक ७८१/११ मधील उर्वरीत नुकसान भरपाई अदा करणेकामी, दावा क्रमांक- ७८०/११ मध्ये नुकसान भरपाई र.रु.४,४०,०००/- चे अर्धी (५०%) उर्वरीत र.रु.२,२०,०००/- व त्यावर दाव्याची तारीख २४/०६/२०११ पासून ते दिनांक ३०/०९/२०१३ अखेर प्रतिवर्षी ६% दराने व्याज र.रु.२९,९८०/- अशी नुकसान भरपाईपोटी व्याजासह र.रु.२,४९,९८०/- व दावा क्रमांक- ७८१/११ मध्ये नुकसान भरपाईपोटी र.रु.९,९७,२००/- चे अर्धी (५०%) उर्वरीत र.रु.४,९८,६००/- व त्यावर दाव्याची तारीख २४/०६/२०११ पासून ते दिनांक ३०/०९/२०१३ अखेर प्रतिवर्षी ६% दराने व्याज र.रु.६७,९४७/- अशी नुकसान भरपाईपोटी व्याजासह र.रु.५,६६,५४७/- मोटार अपघात न्यायाधिकरण-VII विजापूर, यांचेकडे जमा करणेकामी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ८८,ह(दोन) च्या तरतुदीनुसार सदर उपरोक्त उर्वरीत नुकसान भरपाई महानगरपालिका निधीतुन अदा करणे आवश्यक आहे. सदर उर्वरीत नुकसान भरपाई देणेकामी मे.न्यायाधिकरणाने दाव्याचे तारखेपासून प्रतिवर्षी ६% दराने व्याज देणेचा निर्णय दिल्याने रक्कम लवकरात लवकर अदा करणे आवश्यक आहे. त्यानुसार उर्वरीत नुकसानभरपाईची रक्कम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०९० विषय क्रमांक – ३२
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – ड प्रभाग विद्युत
सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.संगिता भोंडवे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.डप्र/वि/१/कावि/४७४/२०१३दि.३१/०८/२०१३

विषय :- विद्युत ड प्रभाग कार्यक्षेत्रातील चालु पुर्ण अंदाजपत्रकाबाबत..

विषय क्रमांक ३२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०९१ विषय क्रमांक – ३३
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – वैद्यकिय
सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.वैद्य/१/कावि/८२९/२०१३दि.१६/८/२०१३
विषय :- पुनावळे व रहाटणी दवाखान्याबाबत..
विषय क्रमांक ३३ चा विचार दिनांक १/१०/२०१३ चे सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०९२ विषय क्रमांक – ३४
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.मसाभां/४/कावि/४७८/२०१३दि.३१/०८/२०१३
विषय : A - Scan Machine व Portable ECG Machine खरेदीबाबत..
विषय क्रमांक ३४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.</u>**

ठराव क्रमांक – ४०९३ विषय क्रमांक – ३५
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – क प्रभाग विद्युत
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.माया बारणे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.वि/क.प्र/७५३/२०१३दि.२८/०८/२०१३
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

भोसरी येथील लांडेवाडी चौकातील शिवसृष्टी प्रकल्पाचे उदघाटन नजिकच्या काळात ना उपमुख्यमंत्री श्री अजितदादा पवार यांचे हस्ते होणार असुन या परिसरात विद्युत विषयक कामे करणेबाबत मा आमदार श्री विलास विठोबा लांडे यांनी दि. ८/८/२०१३ चे पत्रान्वये या विभागास कळविले आहे. या पत्रामध्ये नमुद केलेप्रमाणे कामे करणेसाठी दि.८/८/२०१३ व १२/०८/२०१३ रोजी मा.कार्यकारी अभियंता (वि) मा.कार्यकारी अभियंता (स्था) समवेत मा.आमदारांची प्रत्यक्ष Site Visit व चर्चेनुसार मा.कार्यकारी अभियंता (वि) यांचे सुचनेनुसार, १) अश्वारुढ पुतळयाचे दोन्ही बाजुस १२.५ मी उंचीचा हायमास्ट बसविणे व ३) लांडेवाडी चौकातील मेघडंबरी येथे लाईट फिटींग बसविणे ही दोन्ही कामे सुरु केली आहेत तसेच लांडेवाडी चौकातील शिवसृष्टी परिसरात फुटपाथवर दोन्ही बाजुने डेकोरेटीव्ह पोल व फिटींग (पुणे मनपाने शनिवार वाडयासमोरील पुलावर बसविलेले पोल व फिटींगप्रमाणे ) बसविणेकामी सुचना केल्या आहेत त्यानुसार पुणे मनपा येथे भेट देऊन संबंधीत क अ श्री महानोर यांचेकडुन माहिती घेतली आहे सदरचे ठिकाणी पुणे मनपाने C I casting pole 8 ft height व त्यावर Lantern type Casting fitting LED 60w बसविल्या आहेत पुणे मनपाच्या स्वीकृत दरानुसार संदर्भिय ठिकाणी करावयाचे कामाचे अंदाजपत्रक तयार केले असता र.रु. १९५५६३०/- इतका खर्च अपेक्षीत आहे सदरचे काम लवकर होणेसाठी या ठिकाणी सुरु असलेल्या नि नो क्र ११/१३ – २०१३/१४ (दर २३.९९%

कमी ) मे इलेक्ट्रो मेकॅनिक्स याचेकडुन करुन घेणे शक्य आहे तथापि या कामामध्ये पुरेशी रक्कम शिल्लक नसलेने याकामास वाढीव प्रशासकीय मान्यता घ्यावी लागणार आहे. या कामास मुळ प्रशासकीय मान्यता रु. २५ लाख आहे वाढीव २० लाख मान्यतेसह एकुण ४३ लाख खर्च होणार आहे. सबब विषयांकीत काम वरील प्रमाणे नि.नो.क्र. ११/१३ – २०१३/१४ मधुन करणेस व याकामी होणारा खर्च २० लाख सह एकुण सुधारीत खर्च रु. ४३ लाख मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०९४ विषय क्रमांक – ३६

दिनांक – १०/९/२०१३

सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.सदगुरु कदम,मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१३ – १४ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तरतुद वर्गीकरण करण्यात येत आहे. (वाढ/घट र.रु. ५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०९५ विषय क्रमांक – ३७

दिनांक – १०/९/२०१३

सुचक – मा. सदगुरु कदम अनुमोदक – मा. चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.सदगुरु कदम, मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव..

मा.स्थायी समिती ठराव क्र. ३९८१ दि.२७/०८/२०१३ चा रोजीचा ठराव रद्द करणेत येवुन नव्याने प्रस्तावा सोबत दिलेला ड प्रभाग व ड मुख्यालयामध्ये सन २०१३ – १४ च्या अंदाजपत्रकामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे फेरबदल करणेत येत आहे. (वाढ /घट र.रु.२८,०५,०००/-)मंजुर करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०९६ विषय क्रमांक – ३८

दिनांक – १०/९/२०१३

सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.सदगुरु कदम, मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड शहरातील मुख्य चौक व रस्ते यासाठी वाहतुक व सुविधा विषयक कामे करणे निविदा नोटीस क्रमांक - ३१/२ – २०११-१२. या विषयांकित कामान्वये मे. शिवम एन्टरप्रायजेस जुना ठराव क्रमांक १३९२८ रक्कम रु. २१,९६,०७८/- (अक्षरी एकवीस लाख शहान्नव हजार अठ्ठयाहत्तर फक्त) असा ठराव मंजुर करणेत आलेला होता त्या ऐवजी नवीन सद्यस्थीतीत २३,१०,०००/- (अक्षरी – तेवीस लाख दहा हजार फक्त) पर्यंत मंजुरी देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०९७ विषय क्रमांक – ३९

दिनांक – १०/९/२०१३

सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.सदगुरु कदम

संदर्भ:- मा.चंद्रकांत वाळके, मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव..

अ प्रभागातील सन २०१३ – १४ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विकास कामांच्या तरतुदींमध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे.(वाढ/घट र.रु. १३ लाख)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०९८ विषय क्रमांक – ४०

दिनांक – १०/९/२०१३

सुचक – मा. सदगुरु कदम अनुमोदक – मा. चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.सदगुरु कदम,मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव..

ड प्रभागातील सन २०१३ – १४ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विषयक विकास कामांच्या तरतुदींमध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे.(वाढ/घट र.रु. १,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४०९९ विषय क्रमांक – ४१

दिनांक – १०/९/२०१३

सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा. चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.आशा शेंडगे,मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव..

मा.स्थायी समितीची सभा दिनांक ३.०९.२०१३ रोजीचे प्रस्तावात नमुद विषयपत्रांमध्ये २०१३- १४ ऐवजी सन २०१२ – १३ असे हवे होते ते वगळुन त्याऐवजी सन २०१२ – १३ अशी दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१०० विषय क्रमांक – ४२

दिनांक – १०/९/२०१३

सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा. चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.सदगुरु कदम,मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड शहरातील लोकसंख्या व त्या अनुषंगाने उपलब्ध असलेले अन्न धान्य वितरण विभागाकडील अधिकारी/कर्मचारी संख्या यांचा विचार करता पिंपरी चिंचवड शहरातील शिधापत्रिकांबाबत नवीन/दुबार शिधापत्रिका देणे तसेच शिधापत्रिकेचे अनुषंगाने इतर बदल करणेसाठी महा ई सेवा कंपनीचे अधीकृत केंद्रामार्फत शिधापत्रिकाबाबतचे सर्व प्रकारचे शासनाने निश्चीत केलेले शुल्क स्वीकारुन अर्ज स्वीकारणे व पुढील कार्यवाहीसाठी पाठविणे तसेच परीमंडळ कार्यालयाकडुन कार्यवाही पुर्ण झालेनंतर तयार शिधापत्रिका व दाखले अर्जदारास विहीत मुदतीत उपलब्ध करुन देणे इ.कामासाठी पिंपरी चिंचवड

मनपा इमारतीमध्ये सी.एस.इन्फोसिस कं.प्रा.लि. चालवित असलेल्या जागेत शिवशक्ती स्वयंरोजगार संस्थेस पुर्वीच्या अटी शर्तीनुसार (मा.जिल्हाधीकारी कार्यालय आदेश क्र.आविअ/जसवि/कावि/६५०/१२ दि. १२/०६/२०१२ नुसार सुविधा केंद्रास मुदतवाढ देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१०१ विषय क्रमांक – ४३
दिनांक – १०/९/२०१३
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा. चंद्रकांत वाळके
संदर्भ:- मा.सदगुरु कदम,मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव..

महानगरपालिकेच्या सन २०१२ – १३ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे तरतुद वर्गीकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे. (वाढ /घट र.रु. ९३,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१०२ विषय क्रमांक – ४४
दिनांक – १०/९/२०१३ विभाग – नगरसचिव
सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.अविनाश टेकावडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नस/२/कावि/४०३/२०१३दि.३/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.महापौर यांचे संभाव्य दि.२५ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर २०१३ दरम्यान युरोप परिषदेस उपस्थीत राहणे व त्याकामी येणा-या खर्च र.रु. ५,०५,६२०/- (अक्षरी र.रु.पाच लाख पाच हजार सहाशे वीस फक्त) यास मान्यता देणे व सदरची रक्कम आगाऊ अदा करणे तसेच याकामी नगरसचिव विभागाकडील स्थायी आस्थापना या लेखाशीर्षावरुन र.रु. ५,००,०००/- सन्मा.सदस्यांचे अभ्यास दौ-याकरीता व प्रशिक्षणाकरीता (वेगवेगळया विभागाकडुन होणारा खर्च खर्ची टाकणेकरीता एकत्रीत तरतुद) या लेखाशीर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१०३ विषय क्रमांक – ४५
दिनांक – १०/९/२०१३ विभाग - दूरसंचार
सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.अविनाश टेकावडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.दूरसंचार/६/कावि/४७/२०१३दि.१०/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वेगवेगळया दवाखान्यात, हॉस्पीटल सुरक्षेच्या दृष्टीने तातडीने सी.सी.टी.व्ही.सर्व्हेलन्स यंत्रणा लावणे आवश्यक आहे. सि.सि.टि.व्ही. सर्व्हेलन्स यंत्रणा उभारणेचे काम हे प्रभाग स्तरावर चालत असुन सध्या सर्वच प्रभागामध्ये सि.सि.टि.व्ही सर्व्हेलन्स यंत्रणा उभारणेसाठी लागणारी तरतुद अत्यल्प आहे. मनपाचे दवाखाने सुरक्षीततेचा विचार करता विद्युत विभागाचे प्रभाग

स्तरीय कामातुन प्रत्येकी र.रु. ७५,००,०००/- (अक्षरी र.रु. पंच्याहत्तर लाख फक्त) प्रती प्रभाग एवढी रक्कम मनपा मुख्य कार्यालय विद्युत विभाग अंतर्गत दूरसंचार विभागाचे विविध रुग्णालये येथे सि.सि.टि.व्ही. यंत्रणा उभारणे या लेखाशीर्षावर एकत्रीत र.रु. ३,००,००,०००/- (अक्षरी र.रु. तीन कोटी फक्त ) वर्ग करुन मनपाच्या दवाखाने येथे अद्यावत सि.सि.टि.व्ही. यंत्रणा उभारणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(जगताप नवनाथ दत्तु)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/४/कावि/ ८५३ /२०१३
दिनांक - १२/०९/२०१३.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.